| आरोग्य सेवा | जाक्र –ताआअ/ एनएचएम 24/2026-27<br>आरोग्य विभाग THO Devgad, तालुका देवगड.<br>दिनांक -15/09/2026 |
|---|---|

## दरपत्रक मागणी नोटीस

सन 2026 - 2027 या आर्थिक वर्षासाठी तालुका आरोग्य कार्यालय, देवगड अंतर्गत देवगड शहरात नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र, देवगड येथे 15 व्या वित्त आयोग अंतर्गत वैदयकिय अधिकारी (Medical Officer), M.B.B.S. उपलब्द झाले नाही तर वैदयकिय अधिकारी B.A.M.S. अधिपरिचारीका (Staff Nurse) & आरोग्य सेवक (पु) (MPW (Male)) कर्मचारी उपलब्ध करुन देणे करिता बाहयसंस्था निश्चित करणेकरिता इच्छुक दरपत्रक धारकांकडून खालील तपशिलात नमूद केलेप्रमाणे बंद लखोटयात दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | शैक्षणिक अर्हता (Educational Qualification) | पदनिहाय मंजूर कमाल मासिक मानधन (Cadre wise approved Maximum Per Month Salary) | मक्तेदाराने सर्व करासहीत भरावयाचा दर |
|---|---|---|---|---|
| 1 | वैदयकिय अधिकारी (Medical Officer) | M.B.B.S. | 60,000/- | मक्तेदाराने दरपत्रक भरताना EPF, ESIC, P Tax , Service Tax व कर्मचारी यांचे बँक खात्यावर जमा करणेची रककम स्वतंत्र पणे नमुद करणेत यावी. |
| 2 | वैदयकिय अधिकारी (Medical Officer) | B.A.M.S. | 25,000/- | |
| 3 | अधिपरिचारीका (Staff Nurse) | GNM / BSc Nursing Course | 20,000/- | |
| 4 | आरोग्य सेवक (पु) (MPW Male) | 12th Pass In Science + Paramedical Basic Training Course OR Sanitary Inspector Course | 18,000/- | |

तरी इच्छुक दरपत्रक धारकांनी सदरची दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेपासून 10 दिवसांपर्यत दुपारी 03.00 वाजेपर्यत विहित नमून्यात परिपूर्ण दरपत्रक बंद लखोटयातून या कार्यालयास समक्ष आणून अथवा डाक सेवाव्दारे सादर करावयाची आहेत. मुदतीत प्राप्त दरपत्रकांची छाननी करुन अटी व शर्तीपूर्ण झालेली दरपत्रके खोलून तुलनात्मक तक्त्याच्या आधारे किफायतशीर दरपत्रक धारकला पुढील आदेश देणेत येईल.

**दरपत्रकाच्या अटी व शर्ती**

01) दरपत्रक सादर करतेवळी दरपत्रकासोबत खालील दस्तऐवज छायांकीत प्रती सादर करणे आवश्यक आहे,

1) संस्था नोंदणी प्रमाणपत्र/ जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र
2) संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स
3) ESIC प्रमाणपत्र
4) P-Tax नोंदणी प्रमाणपत्र
5) EPF नोंदणी प्रमाणपत्र
6) 3 Month EPF भरणा केलेबाबतचे दस्तऐवज

02) दरपत्रक धारकाने मासीक मानधनाच्या किमान 3.85% ते कमाल 7% सेवा शुल्क आकारुन तसेच EPF, ESIC व P Tax या वजावटी करुन उर्वरित मानधन रक्कम कर्मचारी यांचे बँक खात्यावर जमा करणे बंधनकारक आहे. ज्या कर्मचा-यांचे मासिक वेतन संस्थेमार्फत ₹२१,००० किंवा त्यापेक्षा कमी देय होणार असेल त्या कर्मचारी यांना ESIC सुविधा देणे बंधनकारक राहील. तसेच ज्या कर्मचा-यांचे मासीक मानधन संस्थेमार्फत रक्कम ₹१५००० किंवा त्यापेक्षा कमी देय होणार असेल त्या कर्मचारी यांना EPF वजावट करणेची जबाबदारी संबधीत संस्थेची राहील.

03) ज्या दरपत्रकधारकांचे दरपत्रक मंजूर होईल त्यांनी आदेश दिलेपासून दरपत्रकात नमूद दरानुसार वैदयकिय अधिकारी (Medical Officer), MBBS उपलब्द झाले नाही तर BAMS वैदयकिय अधिकारी पद भरणेबाबत विचार करणेत येईल. अधिपरिचारीका (Staff Nurse) & आरोग्य सेवक (पु) (MPW (Male)) यांची तात्काळ नियुक्ती त्यांचे नियुक्ती आदेश या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहिल. तसेच कार्यालयाकडुन रिक्त पदांचा तपशिल आवश्यकतेप्रमाणे देणेत येईल त्यानुसार नियुक्ती आदेश देणे बंधनकारक राहील.

04) ज्या दरपत्रकधारकांचे दरपत्रक मंजूर होईल त्यांनी दरमहाचे देयक पुढील महिन्याच्या 1 तारीखला दरपत्रकात नमूद दरानुसार तसेच संबधीत कर्मचारी हजेरी अहवालासोबत या कार्यालयाला सादर करणे आवश्यक आहे. संबधीत कर्मचारी यांचेकडून केलेल्या कामाचे मुल्यामापन करुन प्रत्यक्ष केलेल्या कामाकाजानुसार मक्तेदार संस्थेच्या देयकामधून शासकीय प्रचलीत दरनुसार टी.डी.एस वजावट करुन देयकाची रक्कम संबधीत मक्तेदाराच्या बँक रक्कम जमा करणेत येईल.

05) तसेच संबंधीत कर्मचारी याना दरमहा ESIC/ EPF/ P-Tax इत्यादी संबधी वजावट विहीत वेळेत करुन तसेच कर्मचारी यांना वेतन प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी ही संबधीत मक्तेदार (मंजूर दरपत्रकधारक) यांची राहिल. त्यास हे कार्यालय जबाबदार असणार नाही.

06) विहित मुदतीत आदेश दिलेपासून कर्मचारी पुरवठा न केल्यास शासन नियमानुसार देय रक्कमेवर दंड देयकामधून वसूल केला जाईल. तसेच मक्तेदार संस्थेचे कामकाज समाधानकारक नसलेस अथवा शासनस्तरावरुन सदर आदेश रदद करणेसंदर्भात आदेश प्राप्त झालेस कोणत्याही क्षणी आगाऊ पुर्वकल्पना न देता सदरचे आदेश रदद करण्याचे अधिकार खाली सही करणार यांना राहतील.

07) मुदतीत प्राप्त न होणारी एक अगर सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

08) ज्या दरपत्रकधारकांचे दरपत्रक मंजूर होणार त्या मक्तेदाराला रक्कम रु.500/- च्या बॉण्ड पेपरवर सोबत जोडलेले करारपत्र देणे बंधनकारक राहिल. सदरचे करारपत्र दिल्यावर कामचा आदेश दिला जाईल.

09) **नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र, देवगड कार्यालयीन वेळ सकाळी 9.00 ते सायंकाळी 5.00 अशी आहे.**

**दरपत्रक मागणी नोटीस लावण्याचे ठिकाण**

01) तालुका आरोग्य अधिकारी, देवगड नोटीसबोर्ड
02) www.nrhm.maharashtra.gov.in
03) www.arogya.maharashtra.gov.in

**Taluka Health Officer**
**Taluka-Devgad**

**वरील संकेतस्थळावर दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून 10 दिवसाच्या मुदतीत दरपत्रक स्वीकारली जातील याची नोंद घ्यावी.**

**मक्तेदार सेवा संस्था व तालुका आरोग्य अधिकारी, देवगड यांचे करारपत्रातील समाविष्ठ करावयाच्या अटी व शर्ती**

**<u>अटी व शर्ती :-</u>**

१) नियुक्त सेवा संस्थेने तालुका आरोग्य अधिकारी देवगडयांचे नावे करारपत्र रु. ५००/- गैरन्यायिक बंधपत्रावर तयार करुन घेणेचे आहे.

२) संबंधित संस्थेचे नोंदणीपत्रक, पॅनकार्ड व आवश्यक ते सर्व पात्रतेचे निकष पुर्ण करणे आवश्यक आहेत. तसेच पात्रतेसंबंधी सर्व विहित कागदपत्रे सुपुर्त करणे आवश्यक आहे.

३) नियुक्त सेवा संस्थेने नियुक्त करावयाच्या मनुष्यबळाला किमान वेतन कायद्याआधारे, माध्यमातुन रोजंदारी देणे बंधनकारक आहे. तसेच Employee Provident Fund, Employee State Insurance Corporation, Professional Tax याबाबत कायद्यानुसार पुर्तता करणेची जबाबदारी संस्थेची आहे.

४) कामासाठी नियुक्त करणेत येणारे व्यक्तींकडे आधार कार्ड असणे आवश्यक आहे.

५) कामासाठी नियुक्त करणेत येणारी व्यक्ती स्थानिक असणे आवश्यक आहे.

६) कामासाठी नियुक्त करणेत येणारी व्यक्ती प्रकृतीने निरोगी व सुदृढ असणे आवश्यक आहे.

७) कामासाठी नियुक्त करणेत येणारे व्यक्तीकडून सदरचे करारपत्र कार्यआदेश दिलेनंतर उमेदवारास हजर होईल त्या दिवशी मुळ प्रतीत सादर करणे बंधनकारक आहे.

८) कामाची वेळ हि नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र, देवगड साठी (सकाळी ९ ते सायंकाळी ५ वेळेत) वाजेपर्यन्त आहे.

९) सेवा संस्थेने नियुक्त केलेल्या कर्मचारी याला कामावर जाणे येणेचा खर्च तसेच अन्य भत्ते शासनाकडून देय नाहीत.

१०) रोजंदारी व्यक्तीचे महिन्यातील प्रत्यक्षात काम केलेले दिवस व स्विकृत दर यांचा गुणाकार करुन त्या रकमेचे देयक अदा करणेत येईल. नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रास मंजूर शासकीय सुटटी संबधीत कर्मचारांना असतील. परंतु सुटटीच्या दिवशी कामावर बोलविलेस संबधीत कर्मचा-यांना कामावर उपस्थित रहावे लागेल त्याकरिता संस्थेस अथवा कामगारास अतिरिक्त मानधन देय नसेल.

११) कामाचे देयक दर महिन्याचे १ तारीखला सदर दिवशी शासकीय सुटटी असलेस पुढील कामकाजाचा दिवशी तालुका आरोग्य अधिकारी, देवगड यांचे नावे सादर करणे बंधनकारक आहे.

१२) देयक अदा करताना शासकिय प्रचलित नियमांनुसार कर वजावट करणेत येतील.

१३) उमेदवारांचे देयक संबधीत अदा करुन त्यांबाबतची पोंच घेणेची तसेच नियमानुसार ईपीएफ व इतर वजावटी करुन भरणेची जबाबदारी ही संबंधित संस्थेची राहील.

१४) रोजंदारी व्यक्तीने काम सोडलेस त्याची पर्यायी व्यवस्था २४ तासांत करावी. विलंब एक आठवड्यानंतर प्रति आठवडा ०.५ टक्के एवढी कपात देयकातून करण्यात येईल.

१५) रोजंदारी व्यक्तीला शासकिय सेवेसाठी अगर इतर कोणत्याही शासकिय हक्कासाठी दावा करता येणार नाही.

१६) रोजंदारी व्यक्तीचे काम समाधानकारक, सौजन्यपुर्ण वर्तणूक, नेमून दिलेले काम वेळेत पूर्ण करावयाचे आहे. तसेच रोजंदारी व्यक्तीची रुग्णकडुन किंवा इतराकडुन कोणत्याही स्वरुपाची तक्रार आल्यास सदरच्या व्यक्तीची तात्काळ पर्यायी व्यवस्था जबाबदारी ही संबंधित सेवा संस्थेची राहील.

१७) रोजंदारी व्यक्तीला कामावर येताना व जाताना कोणताही अपघात अगर तत्सम इजा किंवा दुखापत झाल्यास त्याची जबाबदारी ही संबंधित सेवा संस्थेची राहील. यावर शासन कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देणार नाही.

१८) कार्यआदेश दिलेपासून २४ तासांचे आत मनुष्यबळ पुरविण्याऱ्या संस्थेने नियुक्तीपत्र देणेचे आहे.

१९) कामाची मुदत संपलेनंतर कोणतीही स्वतंत्र सुचना न देता कार्यआदेश संपुष्टात येतील.

२०) सेवा पुरविणेचा कालावधी हा करार दिनांकापासुन ते ३१ मार्च २०२७ पर्यन्त राहील. कामाच्या आवश्यकतेनुसार यापुढील कराराला वाढ देणे अथवा करार संपण्यापुर्वी कामाचा आदेश रदद करणेबाबतचा अधिकार हा तालुका आरोग्य अधिकारी, देवगड यांना राहिल.

२१) मनुष्यबळ पुरविणेची संख्या आवश्यकतेनुसार बदलत राहील. याबाबत आवश्यक सर्व बदलाबाबतचे सर्व अधिकारी मा. तालुका आरोग्य अधिकारी, देवगड यांचेजवळ राहतील. कोणत्याही व्यक्ती अगर संस्थेला स्पष्टीकरण मागता येणार नाही अगर न्यायालयात जाता येणार नाही.

२२) संस्थेने पुरवठा कर्मचा-याला दवाखान्याला असेलेल्या सर्व शासकीय सुटटी व सार्वजनिक सुटटी भरपगारी असतील. या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा रजा मंजूर नाहीत. संबधीत कर्मचा-यांना सुटटी हवी असल्यास सदर दिवशी इतर कर्मचा-याची (पर्यायी व्यवस्था) संस्थेला करावी लागेल. अन्यथा सदर दिवसाचे मानधन वजावट केले जाईल.

**Taluka Health Officer**
**Taluka-Devgad**